## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. ११/६/२०१९

**विषय क्रमांक :– १६३ त्वर्य**

मा.योगेश मुळीक व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ११/६/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील कोरेगाव पार्क ते कल्याणीनगर जोडणा–या आगाखान पुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते हे डी.पी. मध्ये ३०.मी. रूंदीचे दर्शविण्यात आलेले असून मात्र पुलाची रूंदी डी.पी. मध्ये २० मी. दर्शविण्यात आली आहे. भविष्यात दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या पाहता तसेच वाहतुकीची होणारी कोंडी दूर होणेसाठी अस्तित्वात असलेल्या पुलाची रूंदी भैरोबा मैला पाणी शुद्धीकरण केंद्र (भैरोबा पंपिंग स्टेशन) च्या बाजूने कोरेगाव पार्क ते कल्याणीनगर पुलाची रूंदी १० मी. वाढविण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १६४ त्वर्य**

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ.नायडू रूग्णालय यांना अनुक्रमे अंदाजे लागणारे ४३८०० लिटर्स व ९१२५ लिटर्स दूध दि.१/४/२०१९ ते ३१/३/२०२० या मुदतीसाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दूध रू.३६=७५ या दराने होणारी र.रू.१९,४४,९९४/– (अक्षरी–रू.एकोणिस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे चौऱ्याएन्नव फक्त) पर्यंत अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ होत असते. शासन वेळोवेळी दर बदलत असते त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर त्याप्रमाणे होणाऱ्या रकमेपर्यंत महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) नुसार दूध पुरविण्यासाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/६० दि. १०/६/२०१९ चे पत्र.

(टिप – सदर खरेदी र.रू.३०००/– पेक्षा जास्त होत असल्याने मनपा अधिनियमानुसार टेंडर्स मागविणे जरूरीचे आहे. तथापी ही खरेदी राज्य शासनाच्या अधिकृत अशा शासकीय दूध योजनेकडून होत असल्याने व यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकिय दूध योजना, पुणे ( गर्व्हनमेंट मिल्क सप्लाय स्किम ) यांचेकडून टेंडर न काढता खरेदी करणेत येत आहे.)

**विषय क्रमांक :– १६५ त्वर्य**

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६१ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६६ त्वर्य**

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६२ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६७ त्वर्य**

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६३ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६८ त्वर्य**

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६४ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६९ त्वर्य**

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६५ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १७० त्वर्य**

रक्कम रू. ३० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/६६ दि. १०/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १७१ त्वर्य**

पुणे मनपाच्या सर्व दवाखाने,रूग्णालये व प्रसुतिगृहांसाठी श्वानदंश लस खरेदी करणे कामी निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या तीन निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक १.लक्ष्मी मेडिकल्स २.एस.बी.जोशी अॅन्ड कंपनी यांचेकडून रूपये ४०,४९,२८७=४१ ( अक्षरी रक्कम रूपये चाळीस लाख एकोणपन्नास हजार दोनशे सत्याऐंशी आणि पैसे एकेचाळीस फक्त ) रकमेपर्यंत जीएसटी करासह ९.५०% अॅबोव्ह दराने म्हणजेच रक्कम रूपये २९५=५९ पैसे प्रति व्हायलप्रमाणे Inj. Anti Rabies Vaccine 0.5 ml / 1 ml १३६९९ व्हायल्सची खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६९ दि. ११/६/२०१९ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१९-२०
RE17F 195
श्वानदंशावरील लस व ईमिनोग्लोबिन खरेदी करणे.
मान्य तरतूद रक्कम रूपये ४८,००,०००/- पैकी ४०,४९,२८७=४१

**विषय क्रमांक :- १७२ त्वर्य**

दि.३१/३/२०२० पर्यंत अतिक्रमण विभागामार्फत होणाऱ्या मालाच्या लिलावासाठी डिलीव्हरी कमिटीमध्ये मा.स्थायी समितीतील दोन सदस्यांच्या नावाचा समावेश करण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/७० दि.११/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १७३ त्वर्य**

आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी व सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त सेवकांसाठी अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना पुणे म.न.पा. आरोग्य विभागामार्फत खालील बाबींनुसार राबविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७३ दि.११/६/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १७४ त्वर्य**

आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त दिनांक १४ ते २० जून या कालावधीत योग सप्ताह व दिनांक २१ जून २०१९ रोजी योग दिन साजरा करणेकरीता राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान यांनी सादर केलेल्या पत्रानुसार आवश्यक असणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्च मा.अति. महा. आयुक्त (वि) यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रीडा विभागाकडील खाली नमूद केलेल्या अर्थशीर्षकातून खर्ची करणेकरीता खालील १ ते ५ बाबीस मान्यता देण्याबाबत मा. अति.महापालिका आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/५८,दि.०७.०६.२०१९ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. ४ दि.१०/६/२०१९ विचारासाठी.

सन २०१९-२०२०
RE27A177
१७ खेळ व क्रीडांगणे
क-पं.नेहरू स्टेडियम
सर्व मनपा शाळांमध्ये नागरिकांना योगासने करता यावी
जागा उपलब्ध करून देणे व प्रशिक्षक नियुक्त करणे. तसेच
उद्यानामध्ये योग प्रशिक्षक उपलब्ध करून देणे.
रक्कम रू.२,००,००,०००/-

१. राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान यांच्या पत्रानुसार त्यांना प्रशिक्षण मानधन, योगासाठी मॅट खरेदी करणे, प्रवास खर्च व चहा-नाष्टा इत्यादी खर्चासाठी र.रू.५,५६,४००/-पर्यंत होणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस.

२.आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त कै. बाबुराव सणस मैदान येथे भवन विभागामार्फत स्टेज, टेबल, खुर्ची, मॅट, बॅनर व्यवस्था करणेसाठी पात्र निविदाधारकास र.रू.२,२०,०००/- पर्यंत होणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस.

३.आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त कै. बाबुराव सणस मैदान येथे विद्युत विभागामार्फत ध्वनिक्षेपण व एल.ई.डी.स्क्रीन व्यवस्था करणेसाठी पात्र निविदाधारकास र.रू.५,००,०००/- पर्यंत होणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस.

४.आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त स्पर्धकांसाठी व मान्यवरांसाठी स्मृतीचिन्ह/ सन्मानचिन्ह नगरसचिव विभागाकडील पात्र निविदाधारकास र.रू.५०,०००/- पर्यंत होणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस.

५.आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त वरील चार बाबीं व्यतिरिक्त होणा-या आकस्मात खर्चाकरीता र.रू.२,००,०००/- पर्यंत होणारा प्रत्यक्ष खर्च संबंधिताना अदा करणेस.

**विषय क्रमांक :- १७५ त्वर्य**

नगरसचिव कार्यालयाकडील बिगारी संवर्गातील खाली नमूद केलेल्या पात्र सेवकांची त्यांचे नावापुढे दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(२) नुसार सेवाविनियम १०(अ) नुसार आज्ञापत्रकाचे दिनांकापासून शिपाई या पदावर बढतीने हंगामी नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जावक क्र. ९०९ दि.११/६/२०१९ चे पत्र.

| अ. क्र. | सेवकाचे नाव | सध्याचे पद व वे.श्रे. | बढतीचे पद व वे.श्रे. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.संजोग संभाजी शिंदे अ.जा. | बिगारी (वे.श्रे.४४४० ते७४४०+ ग्रे.पे. २३००+मान्यभत्ते+मान्य वि.वे.) | शिपाई. (वे.श्रे.४४४०ते७४४०+ग्रे.पे २३५०+मान्यभत्ते+मान्य वि.वे ) | नगरसचिव कार्यालयाकडील अजा गटाच्या रिक्त असलेल्या जागेवर बढतीने नेमणूक |
| २ | श्री. विशाल रमेश भोकरे भज(ब) | बिगारी (वे.श्रे.४४४० ते७४४०+ ग्रे.पे. २३००+मान्यभत्ते+मान्य वि.वे.) | शिपाई. (वे.श्रे.४४४०ते७४४०+ग्रे.पे २३५०+मान्यभत्ते+मान्य वि.वे ) | नगरसचिव कार्यालयाकडील भज(ब) गटाच्या रिक्त असलेल्या जागेवर बढतीने नेमणूक |
| ३. | श्रीमती पुष्पा चंद्रकांत कु-हाडे भज(अ) | बिगारी (वे.श्रे.४४४० ते७४४०+ ग्रे.पे. २३००+मान्यभत्ते+मान्य वि.वे.) | शिपाई. (वे.श्रे.४४४०ते७४४०+ग्रे.पे २३५०+मान्यभत्ते+मान्य वि.वे ) | नगरसचिव कार्यालयाकडील खुल्या गटाच्या रिक्त असलेल्या जागेवर बढतीने नेमणूक |

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**